दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : २५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०९ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







**आजचा सुविचार**

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थने साठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त आहे.

– स्वामी विवेकानंद

# राज्यात आरक्षणाचा वणवा पेटणार, निघणार विराट मोर्चा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, बीड :** मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईमध्ये आंदोलन केलं, या आंदोलनामध्ये लाखो मराठा बांधव सहभागी झाले होते. मराठा समाजाला या आंदोलनाच्या माध्यमातून मोठं यश मिळालं आहे, मनोज जरांगे पाटील यांच्या अनेक मागण्या मान्य झाल्या आहेत. सर्वात मोठी मागणी म्हणजे हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबतचा जीआर काढण्यात आला आहे.




दरम्यान मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबतचा जीआर काढण्यात आल्यानंतर ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला आहे, ओबीसी समाजाचा या जीआरला विरोध आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यात येऊ नये, अशी ओबीसी समाजाची मागणी आहे. या संदर्भात ओबीसी समाज आता कोर्टात देखील धाव घेण्याची शक्यता आहे. एकीकडे राज्यात आरक्षणावरून मराठा समाज आणि ओबीसी समाज आमने-सामने आला असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे ती म्हणजे आता बंजारा समाज देखील एसटीतील आरक्षणासाठी एकवटला आहे.

बीड शहरात आज जिल्ह्यातील बंजारा समाजाची व्यापक बैठक संपन्न झाली. आजच्या बैठकीमध्ये काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये हैदराबाद गॅझेटनुसार एसटी आरक्षणात बंजारा समाजाचा समावेश करावा या प्रमुख मागणीचा समावेश आहे. त्यासाठी आता १५ सप्टेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड असा विराट मोर्चा समाजाच्या वतीनं काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आमच्या आरक्षणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, अन्यथा महाराष्ट्रातील सगळे रस्ते आम्ही बंद करू असा इशारा यावेळी बंजारा समाजाकडून देण्यात आला आहे. दरम्यान बाजारा समाजानं दिलेल्या या इशाऱ्यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे.

एकीकडे राज्यात हैदराबाद गॅझेटचा जीआर काढण्यात आल्यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे, तर दुसरीकडे आता बंजारा समाज देखील आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे. हैदराबाद गॅझेटनुसार समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं अशी त्यांची मागणी आहे. त्यासाठी समाजाच्या वतीनं आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.






## वाचक पत्र

### श्राद्धकर्म करायलाच हवे !

हिंदू धर्मशास्त्रानुसार मनुष्यप्राणी त्याच्यावरील चांगल्या वाईट संस्कारामुळे अनेक चांगली वाईट कर्मे करतो ज्याचे फळ निर्माण होऊन ते भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. आयुष्यभरात कमावलेली संपत्ती, नात्यांमधील देवाणघेवाण, अर्धवट राहिलेले व्यवहार यांमुळे मृत्यूनंतरही प्रत्येक जीव सद्गतीला प्राप्त होतोच असे नाही. काही जीव मृत्यूनंतही अडकून राहतात. अशांच्या शांतीसाठी हिंदू धर्मात विविध विधी सांगितले आहेत. मृत्यू पावलेल्या आपल्या नातेवाईकांचा पुढील मार्ग सुकर व्हावा यासाठी केल्या जाणाऱ्या विधींनाच श्राद्ध विधी किंवा श्राद्ध कर्म म्हटले जातात. भाद्रपद पौर्णिमेनंतर सर्वपित्री अमावास्येपर्यंतच्या काळात समस्त पीतर हे पृथ्वीच्या जास्तीत जास्त जवळ आलेले असतात. आपले जवळचे नातेवाईक ज्या तिथीला निर्वर्तले असतील त्या तिथीला त्यांच्या सद्गतीसाठी ब्राह्मणभोजन द्यावे असे शास्त्र सांगते. पितर कावळ्याच्या रूपात येऊन अन्नग्रहण करतात असा प्रघात मागील काही वर्षांपासून पडला आहे. त्यामुळे या तिथींना कावळ्यालाही घास दिला जातो. प्रभू श्रीरामचंद्रांनी आपले पिता दशरथाच्या सद्गतीसाठी श्राद्धकर्म केल्याचा उल्लेख रामायणात आढळतो. छत्रपती शिवरायांनी आपल्या आई वडिलांचे श्राद्ध केले आहे. त्यामुळे याविषयी कोणतीही शंका न बाळगता पितृपक्षात प्रत्येकाने श्राद्ध कर्म करावे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# राज्यभरात गणरायाला उत्साहात निरोप, आता पीओपी मूर्तींवर होणार पुनर्प्रक्रिया

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** सार्वजनिक गणेशोत्सवासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची मार्गदर्शक तत्त्वे यांना अनुसरून मूर्ती विसर्जनानंतर कार्यवाही करण्यासाठी मुंबई महापालिकेने प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) ठरवून दिली आहे. या कार्यपद्धतीच्या आधारे मूर्ती विसर्जनानंतर पुनर्प्राप्ती आणि पुनर्प्रक्रिया करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. त्यानुसार यंदाच्या गणेशोत्सवात रविवार दुपारपर्यंत एकूण १ हजार ९८२ मेट्रिक टन पीओपी अवशेष गोळा करण्यात आले. रविवार रात्रीपर्यंतही विसर्जन सुरूच राहिल्याने यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

हे अवशेष गोळा केल्यानंतर त्यावर पुनर्प्रक्रिया केली जाणार असून यासंदर्भात मुंबई महापालिकेत लवकरच बैठकही होणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव तसेच इतर सण-उत्सव पर्यावरणस्नेही रीतीने साजरे होण्यासाठी उच्च न्यायालयाने विविध निर्देश दिले आहेत.



**विसर्जनासाठी विक्रमी कालावधी...**

**पुणे :** शहरातील गणेशोत्सवाच्या आनंदसोहळ्याची सांगता रविवारी ३४ तास ४४ मिनिटांच्या विक्रमी वेळेनंतर रात्री साडेआठच्या सुमारास झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत एक तास अगोदर मिरवणूक सुरू करूनही मिरवणुकीसाठी आजवरचा आणि २००५नंतरचा विक्रमी कालावधी लागला. टिळक रस्त्याने आलेल्या अमरज्योत मित्र मंडळाच्या बाप्पाचे रात्री आठ वाजून १४ मिनिटांनी विसर्जन झाल्यानंतर मिरवणुकीची सांगता झाली. पोलिसांचे फसलेले नियोजन, अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव, ढोल-ताशा पथकांचे रेंगाळलेले वादन आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी ही मिरवणूक लांबण्यामागील महत्त्वाची कारणे होती. टिळक चौकात कानठळ्या बसवणारा आवाज सुरूच होता. पोलिसांच्या वारंवार सूचनांकडे अनेक मंडळांनी दुर्लक्ष केले. तरुण ट्रॅक्टरवर चढून बेभान होऊन नाचत होते. पोलिसांना प्रत्यक्ष ट्रॅक्टरसमोर जाऊन त्यांना खाली उतरवावे लागले. डीजेच्या अतिरेकामुळे मंडळे थांबत होती, रांग पुढे सरकत नव्हती. फटाक्यांवर बंदी असतानाही टिळक चौकात एका मंडळाने जोरदार आतषबाजी केली. त्यामुळे चौकात एकच गर्दी उसळली. नियमांचे उल्लंघन केल्याने आता पोलिस काय कारवाई करतात, याकडे लक्ष लागले आहे.

**नाशिकमध्ये भरपावसात सहभाग**

**नाशिक :** ढोल-ताशांच्या निनादात विघ्नहर्त्यावर फुलांची उधळण करीत 'गणपती बाप्पा मोरया...', 'बाप्पा निघाले गावाला...'च्या जयघोषात भगवे ध्वज फडकावत भरपावसात सहकुटुंब सहभाग घेत जड अंत:करणाने नाशिककरांनी शनिवारी लाडक्या गणरायाला निरोप दिला. तब्बल १३ तासांनी मध्यरात्री १ वाजता मिरवणुकीची सांगता झाली. सकाळी ११.३० वाजता मानाच्या मंडळांची मिरवणूक पुढे सरकली. ढोल पथकांची सलामी देतानाच वरुणराजानेही हजेरी लावली. 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करीत ढोल-ताशा पथके, नाशिक ढोल, लेझीम पथके आणि पारंपरिक वेशात सहभागी तरुणाई मिरवणुकीची खासीयत ठरली.

छत्रपती संभाजीनगर येथे गणेश विसर्जनाची यंदाची मुख्य मिरवणूक भरपावसातही शांततेत, शिस्तीत व डोळे दिपवणारी ठरली. एकापेक्षा एक भव्य आणि सजवलेल्या गणेश मूर्तींनी लक्ष वेधून घेतलेच; शिवाय चालू घडामोडींवर भाष्य करणाऱ्या कितीतरी सजीव देखाव्यांनी निराळी वातावरण निर्मिती केली.

## डोंगरगाव शिवारात वीज कोसळून जनावरांचा गोठा जळून खाक

### ४ गायी, २ वासरे व शेती उपयोगी साहित्य जळून खाक

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतातील गोठ्यावर अचानकपणे वीज कोसळून चार गाई दोन वासरे तसेच शेती उपयोगी साहित्य पूर्णतः जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे त्या शेतकऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



दि. ७ सप्टेंबर रविवार रोजी सायंकाळी ८.३० सुमारास अचानक डोंगरगाव शिवारात रिमझिम पाऊस वीजांचा कडकडाट सुरू झाला या शिवारातील शेतकरी किशनराव भुजंगराव व्यवहारे रा.डोंगरगाव यांच्या शेती गट क्रमांक १५२ मध्ये शेतातील गोठ्यावर अचानकपणे वीज कोसळली असून यात चार गायी व दोन वासरे तसेच २० पीयूसी पाईप, तुषार संच, फवारणीची पिचकारी, जनावरांचे खाद्य इ.शेती उपयोगी साहित्य पूर्णतः गोठा जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.

या घटनेनंतर दि.०८ सप्टेंबर सोमवार रोजी मुदखेड महसूल प्रशासनाकडून तलाठी एस.डी.देवापूरकर,मुदखेड तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रणिता पेंडकर, डॉ.एस.एस.बंडेवार,पशुधन पर्यवेक्षक एस.एम.वारकड, पंच सरपंच शिवानंद पांडुरंग पुयड, विजय गोपीराज व्यवहारे, शिवानंद नागोराव व्यवहारे, शेतकरी किशनराव व्यवहारे, पत्रकार रुखमाजी शिंदे,अमोल टेकले, सतीश व्यवहारे,गोपीराज व्यवहारे,सुनील व्यवहारे,अनिल व्यवहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचनामा करून सदर अहवाल जिल्हा प्रशासनाकडे पाठवण्यात आल्याची माहिती दिली आहे.या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## ७ वर्षांच्या मुलाच्या आईला लग्नाचं आमिष

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नवी मुंबई :** सातारा येथे राहणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणाने एका ३२ वर्षीय विवाहितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर दोन वर्षे लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. रोहित चव्हाण असे या तरुणाचे नाव असून कळंबोली पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी रोहित सिव्हिल इंजिनीअर असून तो सातारा, पाटण तालुक्यातील कोयना नगर येथे राहण्यास आहे. तर पीडित विवाहितेचे सासर सातारा येथील असून तिला सात वर्षांचा मुलगा आहे. तिच्या पतीला दारुचे व्यसन असल्यामुळे पीडिता आपल्या मुलासह पवई येथे माहेरी राहण्यास आहे. २०२३ मध्ये ती सातारा येथे राहण्यास असताना, तिचे आरोपी रोहित चव्हाणशी सूत जुळले होते. त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तसेच तिच्या मुलाचा सांभाळ करण्याचे आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने तिला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्याशी संबंध ठेवले. मागील दोन वर्षांपासून या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू होते. त्यानंतर रोहितने दोन महिन्यांपूर्वी दुसऱ्या मुलीशी लग्न जुळवले. याबाबतची माहिती पीडित विवाहितेला समजल्यानंतर तिने रोहितच्या होणाऱ्या पत्नीला त्यांच्या संबंधांबाबत माहिती दिली.

# अंमली पदार्थांसह ३० लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरने पडोली चौकात रचलेल्या सापळ्यातून तब्बल २९८ ग्रॅम ब्राऊन शुगर / हेरॉईन जप्त करण्यात आले असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. कार, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण तीस लाख एकोणवीस हजार पाचशे पन्नास रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. छोटू उर्फ नितीन शंकर गोवर्धन (वय ४२, रा. महात्मा फुले वार्ड, बाबुपेठ, चंद्रपूर) हा आरोपी त्याची कार (क्र. (एमएच-३४- बीआर--७७६५) ने चंद्रपूरमध्ये ब्राऊन शुगर विक्रीसाठी आणणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीवर पडोली चौक येथे सापळा रचण्यात आला. कार तपासली असता गोवर्धन याच्या ताब्यात २९८ ग्रॅम ब्राऊन शुगर मिळून आली. त्याच्यासोबत असलेल्या साथीदार साहिल सतिश लांबदुरवार (वय २३, रा. भिवापूर वार्ड, चंद्रपूर) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

सदर गुन्ह्यात वापरलेली कार, मोबाईल, रोख रक्कम यासह एकूण ३०,१९,५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या दोन्ही आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन पडोली येथे गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पडोली पोलीस करीत आहेत.



गही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कामगिरीत पडोली पोलीस ठाण्याचे सपोनि योगेश हिवसे, स्थागुशा सपोनि दिपक कॉक्रेडवार, सपोनि बलराम झाडोकर, पोउपनि संतोष निंभोरकर, विनोद भुरले, सर्वेश बेलसरे, सुनिल गौरकार, सफौ धनराज करकाडे, स्वामी चालेकर, पोहवा नितीन रायपुरे, संतोष येलपुलवार, चेतन गज्जलवार, गणेश मोहुर्ले, गणेश भोयर, जयसिंग, सुरेंद्र महंतो, सचिन गुरनुले, दिपक डोंगरे, विजयमाला वाघमारे, पोअं किशोर वाकाटे, शंशाक बादामवार, मिलींद जांभुळे, सुमित बरडे, अजित शेन्डे, प्रफुल्ल गारघाटे, चापोहवा प्रमोद डंभारे, मिलींद टेकाम तसेच सायबर पोलीस स्टेशन, चंद्रपूर यांचा समावेश होता.

# संपादकीय



## शेतकऱ्यांना दिलासा कधी?

मराठवाड्याचा बहुतांश भाग सिंचनाच्या बाबतीत समृद्ध नाही. कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने त्यास निसर्गावरच अवलंबून राहावे लागते. पाणीटंचाई पाचवीला पूजली आहे. उन्हाळा सुरू होण्याआधीच अनेक भागांत पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होतो. मग गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो; त्याला कालमर्यादा नसते. काही वर्षांपूर्वी लातूरला रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता. पाणीटंचाई नित्याची असतानाच मागील काही वर्षांत अवकाळी पाऊस, गारपीट यांमुळे विभागात अतोनात नुकसान होत आहे. पावसाळ्यात खंड आणि अतिवृष्टीमुळे नुकसान असा हा दुहेरी फटका आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरीवर्ग पुरता हवालदिल झाला आहे.

गेल्या पाच वर्षांत कोणत्या ना कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. ऑगस्ट २०२०मध्ये पावसाच्या तडाख्यात एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जवळपास ४५,३६९ हेक्टरवरील पिके बाधित झाली. पंचनामे पूर्ण झाल्यावर सरकारकडून प्रचलित नियमाप्रमाणे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत झाली. एका शेतकऱ्याकडे दहा हेक्टर शेतजमीन असली, तरी शासकीय मदत मात्र दोन हेक्टरपर्यंतच दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक मदतीसाठी पीक विम्याचाच आधार राहतो; परंतु, या भरपाईसाठी अनेकदा मोठी प्रतीक्षा करावी लागते; शिवाय ती अनेकदा पुरेशी नसते. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना वाढीव दराने व तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय झाला. एक रुपयात पीक विमा काढण्यात येत होता. ही योजना आता रद्द झाल्याने शेतकऱ्यांना जास्तीचे पैसे भरावे लागत आहेत. हा अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांवर अन्याय आहे.

जून ते ऑक्टोबर २०२२ या काळात पावसाने पुन्हा कहर केला. लाखो हेक्टरवरील पिकांना फटका बसला. नुकसानभरपाई देताना ८.५७ लाख हेक्टरवरील नुकसानापोटी १२१५ कोटी रुपयांचा मदतनिधी सुमारे १२ लाख बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आला. यात अतिवृष्टीच्या निकषाबाहेरील पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी विशेष बाब म्हणून बाधित शेतकऱ्यांना मदत केली गेली. २०२३मध्ये आधी गारपीट आणि नंतर अवकाळी पावसाचा फटका रब्बी पिकांना बसला. २०२४मध्येही अतिवृष्टीमुळे २३ लाखांहून अधिक हेक्टरवरील पिके पाण्यात गेली. वीज पडून, पुरात वाहून आदी नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकांचा मृत्यू झाला. शेकडो जनावरे दगावली. पंचनामा पूर्ण झाल्यानंतर विभागीय आयुक्तालयामार्फत नुकसानभरपाई देण्यासाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर झाला. सरकारने आपल्या वेळेनुसार मदतनिधी वितरित केला. यंदाही मागच्यासारखीच परिस्थिती आहे. फेब्रुवारी ते मे या काळात यंदा अवकाळी पावसाने व गारपिटीने मोठे नुकसान झाले. ३४ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील रब्बी पिकांसह फळबागांना फटका बसला. यात सुमारे ६० कोटी रुपयांची नुकसानभरपाई राज्य सरकारने दिली. जून महिन्यात अतिवृष्टीमुळे छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड, बीड जिल्ह्यांतील शेकडो हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्यात गेली. ६४८५ हेक्टरवरील पिकांच्या नुकसानपोटी पंधरा कोटी रुपयांचा मदतनिधी दिला गेला; पण नुकसानीचे दुष्टचक्र अद्यापही कायम आहे. जूनमध्ये चांगला पाऊस झाला, पुढे खंड पडला.

मराठवाड्यात सर्वदूर दमदार पावसाची प्रतीक्षा असतानाच, १५-१६ ऑगस्टनंतर पावसाने सर्वत्र कहर केला आहे. नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशिव जिल्ह्यांतील अनेक मंडलांत अतिवृष्टी झाली. १८३२ गावांतील सुमारे साडेपाच लाख शेतकरी बाधित झाले असून, ४.६३ लाख हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. महसूल, कृषी विभागाच्या पथकांकडून नुकसानीचे पंचनामे सुरू असतानाच अनेक भागांत पुन्हा अतिवृष्टी झाली. त्यामुळे बाधित क्षेत्र वाढणार हे निश्चित. गेल्या दोन दिवसांत नांदेड, हिंगोली, जालना, धाराशिव जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. या नुकसानीचे पंचनामे केव्हा पूर्ण होणार आणि निधी मागणीचा प्रस्ताव सादर होऊन त्यानंतर सरकार नुकसानभरपाई केव्हा देणार, याकडे बाधित शेतकऱ्यांचे लक्ष आहे.

# सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यालगत 'टीईटी' ची सक्ती !

## सक्तीच्या भक्तीत तरा, नाहीतर घरचा रस्ता धरा

शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी भारत सरकार आणि राज्य सरकार गेल्या काही वर्षांपासून अनेक सुधारणा राबवत आहेत. शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी' चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे.

'टीईटी' परिक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय सेवेत राहू शकत नाही किंवा पदोन्नतीही मिळवू शकत नाही. अन्यथा सदर शिक्षकांना सेवानिवृत्ती स्वीकारावी लागेल. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची पात्रता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांना 'टीईटी' उत्तीर्ण होणे अपरिहार्य आहे. मात्र, बालशिक्षण हक्क कायदा २००९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक आणि पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना टीईटीतून वगळले आहे. राज्यात ५३ वर्षावरील अंदाजे १ लाख ४९ हजार शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांनी २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कार्यवाही करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महाराष्ट्रच नव्हे, तर उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

दुसरीकडे शिक्षकांमध्ये संभ्रम असून २५-३० वर्षांपासून शाळेत सेवा देणा-या आणि वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना ही परिस्थिती मोठी धक्का देणारी आहे. शिक्षकांच्या जीवनात निवृत्तीपूर्व काळ शांततेने घालवण्याचा असतो. पण आता ५३ वर्षे वय असलेल्या शिक्षकांसाठी 'टीईटी' मोठं आवाहन बनले आहे. त्यांच्या नातवंडांसोबतच त्यांनाही अभ्यास करून परीक्षा द्यावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय, शासनाने फक्त दोनच संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे.

या शाळांवर सुमारे ४.७९ लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वाच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने 'टीईटी' बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे शिक्षकांची पदोन्नती आता 'टीईटी' वरच आहे. शिक्षण सेवकांना ३ वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात. पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'टीईटी' ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी 'टीईटी' उत्तीर्ण असणारे ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. यामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता आणि नाराजी आहे. अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, दीर्घकाळ सेवा दिलेल्या शिक्षकांना अशा प्रकारे परीक्षा द्यायला लावणे अन्यायकारक आहे. तसेच, फक्त दोनच संधी देण्यात आल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही संघटनांनी या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

आता शासन त्यावर धोरण ठरवणार आहे. त्यानुसार परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम आणि मार्गदर्शक सूचना दिल्या जातील. परंतु शिक्षकांना भीती आहे की, वय झाल्यामुळे अभ्यास पुन्हा करणे कठीण जाईल. यामुळे अनेकांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागू शकते. अनेक शिक्षकांनी २५-३० वर्षे सेवा करून आता फक्त काहीच वर्षे निवृत्तीपर्यंत उरली आहेत. त्यांच्या मते, इतक्या वर्षांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करून अचानक परीक्षा लावणे अन्यायकारक आहे. शिक्षक संघटनांचा दावा आहे की, अनुभव आणि अध्यापन कौशल्यालाच महत्त्व द्यावे, केवळ टीईटीला नाही.

सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळेल. प्रत्येक शिक्षकाला पात्रता सिद्ध करावी लागेल. त्यामुळे भविष्यात शिक्षणाची पातळी उंचावेल. परंतु दुसरीकडे, अनुभवी शिक्षक नापास झाल्यास त्यांच्या जागी कमी अनुभव असलेले शिक्षक प्रमुख होतील, हा एक वेगळा धोका आहे. एकीकडे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल, पण दुसरीकडे वृद्ध शिक्षकांसाठी ही परीक्षा मोठं आवाहन ठरणार आहे. शासनाने याबाबत संतुलित निर्णय घेणे आणि शिक्षकांना योग्य मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**७०५७१८५४७९**

# मग जनसामान्यांनी जायचे कुठे...?

एकेकाळी दक्षिण मुंबई हीच खरी मुंबई म्हणून ओळखली जात होती. मुंबई म्हटल्यावर केवळ दक्षिण मुंबईतले कोळीवाडे, समुद्रकिनारे, लालबाग, परळची कामगार वस्ती, चिंचपोकळी, भायखळा, डोंगरी, महम्मद अली रोड, बोरीबंदर होते. ही दक्षिण मुंबई फोर्ट किंवा फाऊंटन म्हणून ओळखली जात होती. मुंबई वेस म्हणजेच आजचे सायन ही मुंबईची 'शीव' होती. इंग्रजांच्या बोरीबंदर गोदीत कामगार म्हणून म्हणून मराठी माणूसच राबत होता. इंग्रजांनी रेल्वे आणल्यावर मांटुगा लेबर कॅम्पसारख्या रेल्वे कामगारांच्या वस्त्या वसल्या. त्याही पुढे लालबाग परळ भागात रेल्वे, पलिका कामगारांच्या वसाहती होत्या. त्यामुळे या भागातील मैदानातूनच जॉर्ज फर्नांडिस यांच्या कामगार चळवळींनीही जोर धरला होता, देशभरातील सर्वात मोठ्या रेल्वे संपाची हाकही याच दक्षिण मुंबईतून दिली गेली होती. तर दक्षिण मुंबईतल्या हुतात्मा चौकात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा देदीप्यमान इतिहास लिहला रचला गेला.

दक्षिण मुंबईतील ताडदेवच्या ऑगस्ट क्रांती मैदानातून महात्मा गांधी यांनी इंग्रजांना भारत छोडोचा नारा दिला, हेच मैदान याआधी गोवालिया टँक या नावाने ओळखले जात होते. याच ठिकाणी इंग्रजांविरोधातील कित्येक आंदोलनांचा एल्गार झाल्याचा इतिहास आहे. दक्षिण मुंबई ही एकेकाळी मैदानांची मुंबई म्हणून ओळखली जात होती. वरळीच्या जांबोरी मैदानात बीडीडी चाळीतून कित्येक कबडीपटू घडले, कित्येक कामगार लढ्यांची आंदोलने या जांबोरी मैदानात झाली. तर फाऊंटनच्या आझाद मैदानातील आंदोलनांचा आणि धार्मिक सामाजिक महत्वाचा इतिहास मोठा आहे. या मैदानात बॉम्बे जिमखाना क्लबची स्थापना १८७५ मध्ये झाली. सामाजिक आणि धार्मिक तसेच राजकीय आंदोलनांचे हे केंद्र मुंबईत सर्वात जुने आहे. तत्कालीन दलित पँथर, लाल बावट्याचे शेतकरी कामगार लढे, या मैदानात इस्लाम धर्मियांच्या पवित्र इजतेमाचीही परंपरा आहे. दक्षिण मुंबईचा इतिहास मराठी माणसांच्या आंदोलनांनी आणि लढ्यांनी व्यापलेला आहे. दक्षिण मुंबई उभारण्यात मराठी माणसांचा वाटा म्हणूनच मोठा राहिला आहे. मात्र या दक्षिण मुंबईवर मराठी माणसांची मालकी मागील १०० वर्षात कमी होत गेलेली दिसत आहे. आज ती नगण्य स्वरुपात राहिली आहे. गिरणी कामगारांची घरे, त्यांच्या गिरण्या बंद झाल्यावर दक्षिण मुंबईतून मराठी माणूस कधीचाच परागंदा झाला आहे. मराठी माणसांना आता दक्षिण मुंबई परवडत नाही. मात्र सगळी महत्वाची राज्य आणि केंद्र सरकारी कार्यालये, उच्च न्यायालय, रुग्णालये, बँकांची मुख्यालये याच दक्षिण मुंबईत आधीपासूनच आहेत. दक्षिण मुंबईच्या किनाऱ्यावर बॅकबे किंवा गोदीभागातील तुरळक कोळीवाडे वगळता मराठी माणूस औषधालाही या ठिकाणी उरलेला नाही. त्याला मुंबईबाहेर कधीच पिटाळण्यात आले आहे. तो आता अंधेरी, घाटकोपर अशा सबर्बन मुंबईतही उरलेला नाही तर तो आता त्याही पुढे ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर फेकला गेला आहे. दक्षिण मुंबईतील शिवसेना शिंदे गटाचे खासदार मिलिंद देवरा यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून दक्षिण मुंबईची भूमी आंदोलनांसाठी दिली जाऊ नये, अशी मागणी केली होती. गुजरातमधील समकालीन धनदांडग्यांना मुंबई विशेष करून दक्षिण मुंबई आपल्या संपूर्ण ताब्यात नसल्याची खंतही आहे. म्हणूनच या मुंबईतून कामगार मराठी माणूस पद्धतशीरपणे हिसकावून लावण्यात आला आहे. तर मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसारख्या प्रकल्पासून उरल्या सुरल्या दक्षिण मुंबईवरही मालकी मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. मुंबईतल्या जुन्या पारसी, बोहरा समुदायांना मराठी माणसांची कधीच अडचण नव्हती. मात्र दक्षिण मुंबईवरील मराठी माणसांचा हक्क कधीचाच संपुष्टात आला आहे. येथील कामगार मंडळं, जुने सांस्कृतिक समूह नावालाच उरले आहेत. त्यावरही मराठी नसलेल्या धनदांडग्यांचे नियंत्रण आले आहे. आता दक्षिण मुंबईतील मैदानेही आंदोलनासाठी नाकारण्याचा होणारा प्रयत्न हा मराठीजनांचा उरला सुरला आवाजही दडपून टाकण्याचा प्रयत्न आहे. सरकारदरबारी आवाज उठवण्यासाठी दक्षिण मुंबईतच मोर्चे नेले जातात. याच ठिकाणी राज्य सरकारचे मुख्यालय अर्थात मंत्रालय असल्याने आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळ आझाद मैदानात तळ ठोकून बसलेले असते. हे चित्र अण्णा हजारे यांच्या अलीकडच्या आंदोलनातीलही आहे. त्यावेळी भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षातील लोकप्रतिनिधींनी या मैदानात आंदोलनबंदी केली नव्हती, त्यावेळी राज्यातील सत्ताधारी त्यांचे आजचे विरोधक असण्याची शक्यता यामागे आहे. जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील आंदोलनात दक्षिण मुंबईत दाखल झालेल्या मराठा आंदोलनकर्त्यांनी जणू काही या दक्षिण मुंबईवर फार मोठे सांस्कृतिक, सामाजिक संकटच आणले असल्याची आवई उठवण्यात आली. दक्षिण मुंबईच्या भांडवलदारी सोनेरी झगमगाटाला गावातल्या काळ्या मातीमुळे बट्टा लागल्याची जोरदार अफवा माध्यमांवर पसरवण्यात आली. दक्षिण मुंबई वसवण्यात आणि आपल्या हक्कासाठी आंदोलने करण्यात ज्या मराठी माणसांचा सिंहाचा वाटा राहिला आहे, त्यांना मैदाने बंद करण्यात येत आहेत. आंदोलनासाठीची ही मैदाने बंद करून भविष्यात धनदांडग्यांसाठी गोल्फ क्लब उघडले गेल्यास नवल नाही. मुंबईतून मराठी कामगार पळवून लावले. आता त्यांचा उरला सुरला आवजही आंदोलनांची मैदाने ताब्यात घेऊन बंद करण्याचे घाटत आहे, असे मिलिंद देवरा यांच्या पवित्र्यावरून दिसते. आपल्या पत्राविषयी देवरांनी नंतर सारवासारव केली, पण जे त्यांच्या मनात आहे, ते पत्रातून उतरले आहे.

**- श्री.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर.**

# वाचक पत्र

## कृत्रिम हौदांत विसर्जित केलेल्या मूर्त्यांचे काय केले जाते ?

नुकतीच अनंत चतुर्दशी सरली. श्री गणेश चतुर्थीला प्राणप्रतिष्ठा करून घरी बसवण्यात येणाऱ्या श्रीगणेशमूर्तीचे पुढे दीड, पाच, सात किंवा दहा दिवस मनोभावे पूजन करून विसर्जन केले जाते. अनंत चतुर्दशीला अखेरचे विसर्जन पार पडले. भक्ताच्या भावामुळे श्री गणेशाची पवित्रके पूजन केलेल्या मूर्तीमध्ये मोठ्या प्रमाणात आलेली असतात ही पवित्रके सर्वदूर पसरून त्याचा अधिकाधिक लोकांना लाभ व्हावा यासाठी श्रीगणेश मूर्तीचे वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्रोतांत विसर्जन करावे असा शास्त्रसंकेत आहे. यामुळेच ग्रामीण भागांमध्ये फार पूर्वीपासून गावातील वाहत्या नदीमध्ये श्री गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते. शहरी भागांत किंवा तालुक्यासारख्या ठिकाणी वाहते पाणी उपलब्ध नसल्याने प्रशासनाकडून गेल्या काही वर्षांत कृत्रिम तलावांचा किंवा हौदांचा पर्याय उपलब्ध करून दिला जात आहे. यंदा या बाबतीत न्यायालयाने दखल घेऊन सहा फुटांपर्यंतच्या मूर्त्यांचे विसर्जन कृत्रिम हौदात करणे बंधनकारक केले होते. कृत्रिम तलावांच्या ठिकाणी चौकशी केली असता विसर्जित केलेल्या मुर्त्यांची माती किंवा अवशेष नंतर कृत्रिम तलावांतून काढून पुढे समुद्रात किंवा नद्यांमध्ये त्यांचे विसर्जित केले जाईल असे काही ठिकाणी सांगितले जाते तर बऱ्याच ठिकाणी या विसर्जित केलेल्या मुर्त्यांचे पुढे काय केले जाते याविषयी तेथील व्यवस्थापक आणि कर्मचारी अनभिज्ञ असतात. यंदा गणेशोत्सवाला राज्य शासनाने 'राज्य महोत्सवाचा' दर्जा दिला; मात्र ठाणे जिल्ह्यातील डायघर गावातील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ गणेशमूर्ती ठेवण्यात आल्याचा संतापजनक प्रकार यंदा उघड झाला होता. हा अवमानकारक प्रकार समजताच ग्रामस्थांनी दिडशेपेक्षा जास्त डंपर मूर्त्यांसह परत न्यायला भाग पाडले. या घटनेचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला होता. भक्तांनी दान केलेल्या आणि कृत्रिम तलावांत विसर्जित केलेल्या मुर्त्या काही ठिकाणी खाणी बुजवण्यासाठी आणि विटा बनवण्यासाठी वापरण्यात आल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. घरी मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्त्यांचा पुढे अशा प्रकारे वापर केला जाणे गणेशभक्तांसाठी अत्यंत वेदनादायी आहे. त्यामुळे गणेशभक्तांच्या श्रद्धेचा मान ठेवून प्रत्येक कृत्रिम तलावांत आणि हौदांत विसर्जित केलेल्या मूर्त्यांच्या अवशेषांचे आणि मातीचे प्रशासनाने पुढे काय केले हे गणेशभक्तांना पुराव्यासह दाखवून द्यायला हवे.



**- सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## लक्ष्मण रेष..

केंव्हांच पोचले लंकेत
ओलांडून लक्ष्मण रेष
डोके फक्त नामधारक
ओरबाडू स्वताचे केश

उदिष्ट स्पष्ट खुणावते
का हरवून बसे उद्देश
बधिर बुध्दी भारावली
ऐकतो कुवृत्ती आदेश

कौतुकअन्यभाषेचे ते
दिनवाणा का स्वदेश
कळेना पाहुणे प्रभुत्व
हळूचं होई चंचु प्रवेश

रोमा रोमात रोमांचक
ओसंडून वाहे अपदेश
हातचेसोडूनि सहजते
हरवूनि बसलो दूरंदेश

ऐकतातबहिरे कान रे
फक्त पक्ष श्रेष्ठी निर्देश
नवीनसन्मार्ग निवडून
कधीतर करे श्रीगणेश

रे उपयोग नाही काही
कितीकरे आत्मक्लेश
सरून जाता रे सद्वेळ
भरणार नाही अनुशेष

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## धनोजे कुणबी समाज मंदिर, लक्ष्मीनगर चंद्रपूरच्या अध्यक्षपदी श्रीधर मालेकर तर सचिवपदी अतुल देऊळकर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** मोठ्या संख्येने सदस्य असलेल्या धनोजे कुणबी समाज मंदिर लक्ष्मीनगर येथील कार्यकारिणी नुकतीच अॅड. पुरुषोत्तम सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली. अध्यक्षपदी श्रीधर मालेकर, उपध्यक्ष संजय ढवस, सचिव अतुल देऊळकर, सहसचिव नामदेव मोरे, सल्लागार मनोहर पाऊणकर, कोषाध्यक्ष सुधाकर काकडे तर सदस्य म्हणून वासुदेव बोबडे, रवींद्र झाडे, अॅड. देवा पाचभाई, मंजुषा मोरे व मनीषा बोबडे यांची सर्वानुमते निवड झाली. यावेळी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, चंद्रकांत गोहकार, डॉ. सुरेश महाकुलकर, मंगल बलकी, पांडुरंग टोंगे, प्रभाताई वासाडे, प्रभाकर दिवसे, अरविंद मुसळे, विजय बदूखल, प्रभाकर पारखी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन सचिव अतुल देऊळकर तर आभारप्रदर्शन सहसचिव नामदेव मोरे यांनी केले. यावेळी गणमान्य समाज नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाटघर ग्रामपंचायतवतीने राबविलेल्या स्वच्छ व पर्यावरण पूरक गणेशोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.०८, भाटघर :** भाटघर, ग्रामपंचायत भाटघर तालुका खंडाळा जिल्हा सातारा यांच्या मार्फत स्वच्छ व पर्यावरण पूरक गणेश उत्सव हा उपक्रम राबविण्यात आला. त्यावेळी गावालगत धरणाच्या तिन्ही पानवट्यावर गणेश मूर्ती संकलन व निर्माल्य संकलन उपलब्ध करून देण्यात आले होते. ग्रामस्थांनी व भाविकांनी गणेश मूर्तींचे मोठ्या भक्ती भावाने धरणाच्या पाण्यामध्ये तीन वेळा बुडवून संकलन केंद्रात सर्व मूर्ती जमा केल्या. गावातील सर्व ग्रामस्थांनी अतिशय भक्तीमय वातावरणात या उपक्रमाचा लाभ घेतला. त्यावेळी भाडगर गावच्या विद्यमान सरपंच सविता वीर, उपसरपंच दगडू नाना वीर, ग्रामपंचायत सदस्य महेश भालेराव, ग्रामपंचायत सदस्य शकुंतला तारू, माजी सरपंच संजय वीर, पोलीस पाटील पांडुरंग भालेराव, ग्रामपंचायत विकास अधिकारी राहुल शितोळे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी महादेव तारू व अमित कांबळे उपस्थित होते.

## आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी जयंती




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, ठाणे :** रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार विजय शिवतारे, गोपीचंद पडळकर, राहुल कुल, विक्रम पाचपुते, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार संजय जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, दौलत शितोळे, अंकुश जाधव, मोहन मदने आदी उपस्थित होते.

इंग्रजांविरुद्ध पहिली ठिणगी पेटवणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणेच त्यांनी गनिमी काव्याच्या सहाय्याने ब्रिटिशांना धडा शिकवला. समाजाच्या शौर्याची परंपरा आजही जिवंत असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाला दोन लाख रुपयांपर्यंतचे बिनतारण कर्ज, तर उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्यास मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. पोलिस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण व प्रशिक्षणाकरिता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना राबवल्या जातील, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, शासनाने ओबीसी मंत्रालय, महाज्योती आणि विविध महामंडळे स्थापन करून विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्ती, ४२ वसतीगृह व विविध प्रशिक्षण योजना सुरू केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींना एकत्र करून स्वराज्य उभारले, त्यांचे शिवकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व जातींना मुख्य प्रवाहात आणणे हेच शासनाचे ध्येय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते माजी मंत्री स्व. गिरीश बापट, माजी आमदार स्व. बाबुराव पाचर्णे, स्व. रामभाऊ जाधव, स्व. सुनील चव्हाण यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार, तर बाबुराव जमादार, छगन जाधव व बाबुराव चव्हाण यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाने उभ्या केलेल्या कक्षाला भेट देऊन राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राजे उमाजी नाईक स्मृतीस्थळास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

## मिरा-भाईंदरला मिळणार ३७७ बेडचं अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मीरा-भाईंदर (ठाणे) :** मीरा रोड हटकेश परिसरात १४ मजली अत्याधुनिक व ३७७ बेडचं मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. याकरिता रुग्णालयासाठी एकही रुपया महानगरपालिकेचा खर्च होणार नसून सर्व खर्च शासनामार्फत केला जाणार आहे. या संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयात बैठक संपन्न झाली.

ठाणे जिल्हा व चचठ क्षेत्रातील हे पहिले मल्टीस्पेशालिटी रुग्णालय असणार असून स्थानिक नागरिकांसाठी ही अत्यंत आनंदाची बातमी आहे.

या रुग्णालयामध्ये ३०० जनरल बेड, ५० ICU बेड उपलब्ध होणार आहेत. तसेच डॉक्टर, नर्स यांच्यासाठी निवास व्यवस्था व पॅरामेडिकल कॉलेजची सुविधाही या ठिकाणी असणार आहे. शासनामार्फत ढूठ च्या माध्यमातून हे रुग्णालय उभारले जात असून, सुमारे ३.३० लाख चौ. फुटांच्या या इमारतीसाठी महानगरपालिकेला कोणताही खर्च करावा लागणार नाही. इतकंच नव्हे तर वैद्यकीय उपकरणांचा खर्च देखील शासनामार्फत केला जाणार आहे. पुढील ३ वर्षांपर्यंत या रुग्णालयाचे काम पूर्ण होईल. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

लोकप्रतिनिधी म्हणून माझ्या मतदारसंघाला चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणं ही माझी जबाबदारी आहे आणि ती मी सातत्याने पार पाडत आहे. या अत्याधुनिक रुग्णालयासह मिळालेल्या सुविधा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. त्यांनी ती जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केले.


त्याचबरोबर मिरा-भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबत आयुक्तांनी तत्काळ दौरा करून मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेला सक्षम होण्यासाठी शासनामार्फत आम्ही या नव्या रुग्णालयाच्या माध्यमातून ही मोठी संधी उपलब्ध करून देत आहोत. योग्य नियोजन आणि जबाबदारीने काम करून महानगरपालिका नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा देईल, असा माझा विश्वास आहे.

## दिव्यातील ५ लाख नागरिकांना आरोग्य सेवांपासून वंचित ठेवून 'आपला दवाखाना' बंद

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील 'आपला दवाखाना' हा ठाणे महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणारा महत्त्वाचा आरोग्य सेवा उपक्रम कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आला असून या निर्णयामुळे दिव्यातील पाच लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य हक्कावर गदा आली आहे. याआधीच फिरता दवाखाना बंद करून नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित करण्यात आले होते आणि आता 'आपला दवाखाना'ही बंद करून महानगरपालिकेने स्वतः दिलेल्या लिखित आश्वासनाचे उल्लंघन केले आहे.




आरोग्य ही घटना प्रदत्त मूलभूत हक्कांपैकी एक असून राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत जीवनाचा व आरोग्याचा हक्क अबाधित आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य अधिनियम,१९४९ आणि महाराष्ट्र नगरपालिकेचा कायदा यांनुसार ठाणे महानगरपालिकेवर नागरिकांना किमान आरोग्य सेवा पुरविण्याची वैधानिक जबाबदारी आहे. दिव्यातील नागरिकांकडून नियमित मालमत्ता कर व स्थानिक कर आकारले जात असूनसुद्धा आरोग्य सेवा न पुरविणे हे सार्वजनिक निधीचा दुरुपयोग व



नागरिकांच्या हक्कांचा भंग आहे. या निष्काळजी व बेकायदेशीर कृतीमुळे भारतीय दंड संहिता कलम १६६, २६९, ३३६ आणि ३०४अ अंतर्गत जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दिव्यात स्थायी दवाखाना व २४७ प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू होईपर्यंत 'आपला दवाखाना' अखंडित सुरू ठेवणे आणि वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने आपत्कालीन सुविधा तसेच आवश्यक वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची तातडीची जबाबदारी आहे.

अन्यथा दिव्यातील नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील तसेच उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा पर्याय खुला राहील, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) कल्याण - कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख अॅड. रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. यावेळी निवेदन देताना कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे शहर प्रमुख सचिन पाटील महिला शहर संघटिका ज्योती पाटील युवा सेना अधिकारी अभिषेक ठाकूर विभाग प्रमुख रवी रसाळ नागेश पवार आकाश विचारे विकी मंचेवार आदी उपस्थित होते.

## मंद्रूपसह परिसरातील ३८ गावात यंदा पहिल्यांदाच डीजेमुक्त मिरवणूका

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, सोलापूर :** मंद्रुप परिसरातील सर्व ३८ गावातून यंदा डीजे मुक्त गणेश विसर्जनाच्या मिरवणूका निघाल्या. यावेळी मिरवणुकीत मंडळांनी पारंपारिक वाद्यांचा वापर करीत नृत्य, कला पथनाट्याच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचा आविष्कार सादर केला.

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या .. अशा जयघोषात लाडक्या गणरायाला जल्लोषपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. मंद्रुप गावातून दुपारी तीन वाजता सुरू झालेल्या मिरवणुका पावणे अकरा वाजता संपल्या. बाजार चौकातून मुख्य रस्त्याने एकामागे एक रांगेत निघालेल्या मंडळांनी बस स्थानकावर आल्यानंतर मिरवणुकीचा समारोप केला. या मिरवणुकीत माळी गल्लीचा महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळ, श्री अष्टविनायक गणेश मंडळ, न्यू बंजारा गणेश मंडळ, सेवालाल गणेश मंडळ, बाल गणेश मंडळ व

शिवप्रेमी गणेश तरुण मंडळ सहभागी झाले होते. यावेळी या मंडळांच्या कार्यकर्त्यांनी व छोट्या चिमुकल्यांनी विविध गीतावर नृत्य केले. तसेच बहारदार लेझीम सादर केले. माळी गल्ली येथील मानाचा महात्मा बसवेश्वर गणेश मंडळाने नृसिंहचा देखावा केला होता.



यंदा सर्वच मंडळांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. इंदिरानगर येथील मरिआईवाले या भटक्या समाजाच्या शिवप्रेमी गणेश मंडळाच्या कलाकारांनी सादर केलेली कला मिरवणुकीचे आकर्षण ठरले. भटक्या समाजातील तरूणांनी रामायणातील प्रसंग, मरीआईच्या गीतांवर कलेचे सादरीकरण केले. आपल्या या कलेतून सर्वांना खिळवून ठेवले होते. यावेळी सर्वच मंडळांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला. शिवाय डीजेला नकार देत पारंपारीक वाद्यांचा वापर केला. या मिरवणुकीत काही मंडळांनी गुलालाची तर काहींनी फुलांची मुक्तपणे उधळण करीत लेझीम टिपरी खेळ सादर करीत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यंदा मंद्रूपचा सीतामाई तलाव तुडुंब भरल्याने अनेक मंडळांनी या तलावामध्ये विसर्जन केले. काही मंडळांनी टाकळी येथील भीमा नदीत विसर्जन केले. मंद्रूपचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे,

यांनी यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. याशिवाय भंडारकवठे, कंदलगाव, विंचूर, कुसुर, निंबर्गी, औराद, बरुर, टाकळी औज, माळकवठे व

कारकल येथील गणेश मंडळांनी मोठ्या उत्साहात मिरवणुका काढल्या.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची घवघवीत कामगिरी ! भैरवनाथ आयटीआयचे ५ विद्यार्थी आऊट ऑफ मार्क्स

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०८, कळंब :** धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने आणि प्राचार्य सतीश मातने यांच्या मार्गदर्शनाखाली, वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत भैरवनाथ अध्यापक विद्यालय व भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींनी नुकत्याच झालेल्या CBT (Computer Based Test) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

या परीक्षेत संस्थेतील ५ विद्यार्थ्यांनी आऊट ऑफ मार्क्स मिळवून संस्थेचा मान उंचावला आहे. तसेच इतर अनेक विद्यार्थ्यांनीही ९०% पेक्षा जास्त टक्केवारी मिळवत संस्थेचा लौकिक वाढवला आहे.

आऊट ऑफ मार्क्स मिळवणारे विद्यार्थी -प्रथमेश आंबिरकर, प्रणव पाचभाई,प्रगती भिसे,राणी काळे,तेजस भराडे तर गुणवंत विद्यार्थ्यांची यादी ही पुढीलप्रमाणे आहे.

**इलेक्ट्रिशियन (प्रथम वर्ष)** - प्रथमेश आंबिरकर - ९५.६६%, सुमित कोल्हापुरे - ९०.५०%,ऋषिकेश जाधव - ८९.३३%,

**वायरमन (प्रथम वर्ष)**

तेजस भराडे - ९०.८३%, कृष्णा चाटे - ९०.००%, बिलाल सिंध - ८७.५०%

**वेल्डर (संधाता)** रितेश शिंदे - ८३.८३%, रवी समुद्रे - ७२.६६%

**कोपा (कंप्यूटर ऑपरेटर प्रोग्रामिंग असिस्टंट)**

निलेश सगट - ८२.५०%, निकिता कांबळे - ८०.३३%,

**इलेक्ट्रिशियन (द्वितीय वर्ष)** प्रणव पाचभाई - ९४.६६%, सुजल गाडे - ९३.३३%, अजय साळुंखे - ९२.३३%

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम व योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे संस्थेचा लौकिक अधिक उंचावला आहे.

**- सुरज भांडे**
**(प्राचार्य)भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब**

**वायरमन (द्वितीय वर्ष)**

सार्थक पवार - ९१.५०%, निखिल हिंगे - ८९.००%, आशिष बोंदर - ८८.५०%

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने, भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुरज भांडे, तसेच प्रा.श्रीकांत पवार, प्रा. सुकेशनी गव्हाणे, प्रा.मोहिनी शिंदे, प्रा.अविनाश घोडके, निदेशक अविनाश म्हेत्रे, निदेशक राजकुमार शिंदे, निदेशक बालाजी रामरुळे, आदित्य गायकवाड, दिक्षा गायकवाड, विनोद कसबे, सोनाली ढमाले आदींनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# १५ सप्टेंबर रोजी मूलभूत हक्क मोर्चा शासकीय कार्यालयांवर धडकणार



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०८, शहापूर :** शहापूर तालुक्यातील वंचित व दुर्लक्षित सम ाजाला गेल्या अनेक दशकांपासून मूलभूत सुविधा न मिळाल्याने संताप उसळला असून आता संघर्ष उग्र होणार आहे. स्वातंत्र्याला ७८ वर्षे उलटून ही तालुक्यातील अनेक पाडे अंधारातच राहिले आहेत. शासन-प्रशासनाच्या सततच्या दुर्लक्षामुळे रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, घरकुल, गावठाण, स्मशानभूमी अशा सुविधा आजही अनेक वाड्यांवर पोहोचलेल्या नाहीत.

या अन्यायाविरोधात श्रमजीवी संघटना - महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शहापूर एस.टी. स्टँड येथून मूलभूत हक्क मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाद्वारे शहापूर वनविभाग, आदिवासी विकास विभाग, तहसील कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालय या चार शासकीय कार्यालयांवर एकाच वेळी धडक देऊन निवेदन सादर केले जाणार आहे.

संघटनेचे तालुका अध्यक्ष मालु हुम णे, सचिव प्रकाश खोडका आणि ठाणे जिल्हा सरचिटणीस दशरथ भालके यांनी सांगितले की, आमच्या मागण्या वारंवार शासनाला कळवल्या, पण आजपर्यंत फक्त आश्वासनेच मिळाली. या वेळीही प्रशासनाने गंभीर पावले उचलली नाहीत तर हा संघर्ष उग्र होईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी शासनावरच राहील, असा इशारा त्यांनी दिला.

**मोर्चाद्वारे शासनासमोर ठेवण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत -**

१) वन जमिनीमध्ये अडीच एकर जागा गावठाणासाठी तात्काळ मंजूर करावी.

२) नव्याने झालेल्या गावठाणांना नागरी सुविधा पुरवाव्यात.

३) प्रत्येक पाड्याला स्मशानभूमी आणि त्याकडे जाणारे रस्ते तयार करावेत.

४) प्रलंबित वैयक्तिक वनहक्क दावे तात्काळ मंजूर करावेत.

५) स्मारक उभारावे तसेच उंभरई येथील आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या समाधीचे जिर्णोद्धार व दुरुस्ती करावी.

६) पाड्यांना मुख्य गावाशी जोडणारे संपर्क रस्ते तातडीने पूर्ण करावेत.

७) शहापूर तालुक्यातील धरणातून जल जीवन योजनेद्वारे गावागावात पाणी पुरवठा करावा.

८)कातकरी आणि इतर वंचित समाजातील बांधवांना जातीचे दाखले, रेशनकार्ड, आधारकार्ड तात्काळ देण्यात यावेत.

९) तालुक्यातील ७० पेक्षा जास्त रस्ते नसलेल्या पाड्यांसाठी आदिवासी प्रकल्पाने तात्काळ निधी मंजूर करावा.

१०) प्रत्येक गावात समाज हॉल व सांस्कृतिक भवन उभारावेत.

११) राष्ट्रीय शौर्य पुरस्कार विजेती हली बरफ यांना कायमस्वरूपी नोकरी द्यावी.

१२) नगरपंचायत हद्दीतील गावांना सर्व मूलभूत सुविधा तातडीने पुरवाव्यात.

मोर्चाच्या तयारीसाठी संघटनेचे पदाधिकारी तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रचार करत आहेत. हजारोंच्या संख्येने नागरिकांनी १५ सप्टेंबर रोजी मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संघटनेने स्पष्ट केले आहे की, हा मोर्चा आमच्या हक्कासाठी आणि जगण्याच्या संघर्षासाठी आहे. शासनाने यावेळीही ठोस निर्णय घेतला नाही तर लढा अधिक उग्र केला जाईल आणि त्याची जबाबदारी शासन-प्रशासनावर राहील, असा इशारा संघटनेने दिला. हा मोर्चा शहापूर तालुक्यातील वंचित समाजाच्या हक्कांसाठीच्या लढ्याचा नवा टप्पा ठरणार असून प्रशासनाच्या भूमिकेची खरी कसोटी लागणार आहे.

# फुलांची उधळण करत भक्तिमय वातावरणात गणपती बाप्पा ला निरोप





**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** अनंत चतुर्दशीच्या दिवशी दिनांक ०६ सप्टेंबर २०२५ रोजी शहरात गणपती विसर्जन सोहळ्याचा उत्साह दिसून येत होता. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान झालेल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी सकाळ पासूनच विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली.

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करत, बाल भजनी मंडळ, वारकऱ्या च्या फुगडी ने टाळ, मृदंगाच्या गजरात फुलांची उधळण करत, व विविध देखावे सादर करत भक्तिमय वातावरणात लाडक्या गणपती बाप्पा ला निरोप देण्यासाठी गणेश भक्त जल्लोष करत, मोठ्या उत्सहात विसर्जन मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने शहरातील शीतला माता मंदिर येथील विहिरीमध्ये विसर्जनासाठी नियोजन करण्यात आलेल्या ठिकाणी गणपती विसर्जन करण्यात आले, तर काही मानाच्या गणपती चे धानोरा येथील गोदावरी नदीमध्ये विसर्जन करण्यात आले. या दरम्यान गणपती विसर्जन शांततेत संपन्न होण्यासाठी पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

**लंबोदर गणेश मंडळाच्या मिरवणुकीत बाल भजनी मंडळाने गणेश भक्तांची मने जिंकली**

पालम तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी डीजे डॉल्बी मुक्त गणपती विसर्जन करावे असे अहवान पोलिसांनी केले होते. या अहवानास प्रतिसाद देत शहरातील लंबोदर गणेश मंडळाने सकाळी अकरा वाजता डीजे मुक्त गणपती विसर्जनाची मिरवणुक सुरुवात करीत गुलाला ऐवजी फुलांची उधळण करत, टाळ मृदंगाच्या गजरात भक्तीमय उत्सहात मिरवणूक काढत एक नवीन आदर्श ठेवला आहे. विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या बाल भजनी मंडळाने गणपती चे गाणे, अभंग, गवळणी, सुंदर गायनाने गणेश भक्तांची मने जिंकली. यावेळी भक्तिमय वातावरणात भक्तांना फुगडी खेळण्याचा मोह आवरला नाही.त्यामुळे वेगळं आकर्षण पाहिला मिळाले. अत्यंत शांततेत व पोलिसांनी सांगितलेल्या सर्व सूचना अमलात आणून लंबोदर गणेश मंडळाचे मुख्य मार्गदर्शक मारोती शेंगुळे यांनी गणेश भक्तांसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

**पोलिसांनी केले पारंपरिक पद्धतीने गणपती विसर्जन**

अनंत चतुर्थीच्या दिवशी तालुक्यात सर्वत्र गणपती विसर्जन असल्याने, विसर्जन प्रक्रिया शांततेत होण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिसांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी असते, गणपती विसर्जन प्रक्रिया शांततेत पार पाडल्यानंतर अनंत चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यातील गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात येते, पालम शहरातील मुख्य रस्त्यावरून ढोल ताशांच्या गजरात, सजीव देखावेसह, सजवलेल्या बैलगाडी मध्ये गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली यामध्ये एरव्ही खाकी वर असणारे पोलीस बांधव पारंपरिक वेशभूषा परिधान करून आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या उत्सहाने सहभागी झाले होते. मिरवणुकीमध्ये पोलीस पोलीस निरीक्षक शेषराव खटाने, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंजुषा मोरे, नागरगोजे, सवंडकर यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी, होमगार्ड, पोलीस पाटील, पत्रकार बांधव, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई आयोजित राष्ट्रस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०८, नवी मुंबई :** नवी मुंबई येथील कलासाधना सामाजिक संस्था, यांच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रस्तरीय प.पू.साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, समाजभुषण पुरस्कार व जीवन गौरव पुरस्कार व राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात रविवार, दि.०७ सप्टेंबर २०२५ रोजी कराडी समाज हॉल, कामोठे, नवी मुंबई येथे मुख्य अतिथी व शुभहस्ते अच्युत पालव पद्मश्री भारत सरकार २०२५ सुप्रसिद्ध जेष्ठ आंतरराष्ट्रीय सुलेखनकार, प्रमुख पाहुणे म्हणून दिगंबर तायडे पद्मश्री पुरस्कार नामांकन २०२६ दानशूर व्यक्तिमत्व, कॅप्टन मनोज भामरे, माजी लष्करी अधिकारी (भारतीय लष्करातील शॉर्ट सर्व्हिस कमिशन्ड अधिकारी), रामजीत (जितू) गुप्ता मुख्य तपास अधिकारी, अँटी पायरसी सेल मुंबई यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष श्रीराम महाजन यांनी केले. सुलेखन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अच्युत पालव यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अनघा जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर देवकर यांनी केले. या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ८३० अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून ५०विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल श्यामची आई पुस्तक. नॅपकिन बुके देऊन सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला. पुढील मान्यवरांच्या पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प.पू.साने गुरुजी जीवन गौरव पुरस्कार उल्हास देशमुख, शारदा राणा, राजेंद्र जावळे, फुंदे शरदराव रघुनाथ प.पू.साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार उषा सिंह, गोरे मनेश बब्रुवान, कृष्णा पाटील, आसिया परविन अब्दुल रहमान, राकेश महाजन, सुरेश जाधव, अर्चना मारकड, महेश जाधव, साधना कोपनर, राजन राठोड, जयसिंग बेटकर, विठ्ठल म.मणूरे, सुनील म्हात्रे. पुनम देसाई, मानसी चव्हाण, सिताराम प्रभु, धनाजी थिटे, किरण सरोदे, ऋता भामरे, नुरी गुलाम मोहम्मद मुस्तफा, मंदार चोरगे, के. परमेश्वर, नितीन मोहरीर, स्मिता प्रल्हाद जोशी, संतोष साखरे, श्रद्धा बनसोडे, चंद्रशेखर साळवे, नरेश लोहार, सुरेश वाघमारे, नॅन्सी मुथु स्वामी, काजल सुर्वे, विश्वनाथ पाचाळ, विजय वाघेला, वर्षा डाभी, वैशाली शेलार

प.पू.साने गुरुजी समाज भूषण पुरस्कार

अजय जिरापुरे, विलास खंडेराव समेळ, गोरखनाथ पोळ, अनिल पाटील, संध्या भांगरे, सत्यवती खळदकर, रवींद्र माहिमकर, सुनील ठाकूर, विपीन राऊत, सुमन देसाई, दिलीप म ोकल, अनंत देवघरकर, अमित कांबळे, राजेंद्र गवळी, परशुराम घाडगे, बिजक्षी राय,

राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचे विजयी स्पर्धक - नरेंद्र हिरामण भुसारे, सुनिल प्रकाश भोसले, घनश्याम प्रकाश बोरसे /चित्रसेन वासुदेव पागधरे या पुरस्कारसाठी ज्ञानेश्वर देवकर, जितेंद्र अहिरराव, समाधान रोकडे, प्रदीप महाजन, श्रीराम महाजन यांनी खूप मेहनत घेऊन पुरस्कार सोहळा यशस्वी केला.

# पनवेल मनपा क्षेत्रात हत्तीरोग रुग्ण शोध मोहीम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, पनवेल :** हत्तीरोग दुरीकरण संबधीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यासाठी हत्तीरोग समस्या असलेल्या व नसलेल्या सर्वच जिल्ह्यांमध्ये हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्याबाबत शासनाच्या सूचना आल्या आहेत. त्यानूसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोहिम राबविण्यात येत आहे. हत्तीरोग रूग्णशोध मोहिमेंतर्गत महापालिकेच्या वतीने ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येत आहे. या अनुंषगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत अतिजोखमीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येत आहेत. या अतिजोखीमीच्या भागांमधून हत्तीपाय रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेले भाग निवडण्यात आले आहेत. तसेच झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली अशा क्षेत्राची देखील निवड करण्यात आल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे.

सदर मोहीमेंतर्गत हत्तीरोग रुग्ण शोधणे व कार्यक्षेत्रात संशयित रुग्णांचे रक्त नमुने गोळा करण्याचे काम व गोळा झालेल्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्याचे काम म हापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत दिवसा हत्तीरोग रुग्ण शोधणे व रात्र रक्त नमुने संकलन एम एफ सर्वेक्षण बहुउद्देशीय कर्मचारी पुरुष व आरोग्य सेवकांकडून टीम द्वारे करण्यात येत आहे.

## थोडक्यात

# परमेश्वर खंडागळे यांच्या वारसदारांना ४ लाखांची शासकीय मदत सुपुर्द



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०८, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील खोरस येथील परमेश्वर साहेबराव खंडागळे हा युवक २९ ऑगस्ट रोजी पुराच्या पाण्यात वाहून गेला होता. प्रशासनाच्या अथक परिश्रमाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी त्याचा मृतदेह सापडला होता. सोमवार, दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी परमेश्वर खंडागळे चे वारस रंजनाबाई खंडागळे यांना पालम तहसील कार्यालयात आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या उपस्थितीमध्ये ४ लाखांची शासकीय मदत देण्याची आली. यावेळी आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या सह गंगाखेड चे उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, पालमच्या तहसीलदार उषाकिरण शृंगारे, नगरसेवक उबेद खान पठाण आदी उपस्थित होते.

# आळंदी नगर परिषदेच्या परिसरातील स्वच्छतागृहाची दुर्दशा...!




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, आळंदी (पुणे) :** स्वच्छ आळंदी, सुंदर आळंदी मोहीम राबवित असलेल्या आळंदी नगर परिषदेच्या परिसरातील म्हणजे अगदी नगरपरिषदेच्या मागच्या बाजूला असलेल्या स्वच्छतागृहाची दुर्दशा वरील छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे झाली आहे. स्वच्छतागृहात असलेल्या संडासाच्या एकाही खोलीला दरवाजा तर नाहीच शिवाय स्वच्छतागृहात पाण्याचीही सोय नाही. तसेच आतमध्ये शिरताच नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. स्वच्छतागृह स्वच्छ होण्यासाठी आहे की, दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ स्वच्छतागृह वापरल्याने आजारी होण्यासाठी आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. या स्वच्छतागृहाचा वापर जवळच असलेल्या भाजी मंडईतील महिला व पुरुष ग्राहक व व्यापारी तर करतातच सोबतच पीएमपीएल बसस्थानकात ये जात करत असलेले प्रवाशी सुद्धा करत आहेत. या प्रकारामुळे स्वच्छ आळंदी, सुंदर आळंदी ही मोहीम फोल ठरताना दिसून येत आहे. तरी या समस्येकडे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन ही समस्या मार्गी लावावी व नागरिकांना स्वच्छ, नीटनेटके स्वच्छतागृह वापरायला खुले करून द्यावे.

# सातारा आयशर शोरूम विरोधात आर.पी.आय चे निवेदन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, सातारा :** सातारा येथील खेड परीसरातील कातकरी वस्ती शेजारील आयशर शोरूमने टाकलेल्या निळ्या पत्र्यामुळे वस्तीतील नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत आर.पी.आय चे उपजिल्हाध्यक्ष प्रतिक गायकवाड यांनी संबंधित शोरूम आणि सातारा शहर पोलीस ठाणे तसेच सातारा शहर मुख्याधिकारी यांना निवेदन दिले. कातकरी वस्ती खेड सातारा येथे आपली स्वतः ची हद्द नसताना कातकरी समाजाच्या भिंतीवरती जाणून-बुजून निळा पत्रा टाकलेला आहे तो तात्काळ काढावा. अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. कातकरी वस्ती येथे कातकरी वस्तीची भिंत यावरती आयशर कंपनीने निळा पत्रा जाणून बुजून गोरगरीब कातकरी समाजाला त्रास देण्यासाठी निळा पत्रा टाकलेला आहे. त्या निळ्या पत्र्यामुळे पावसाचे पाणी त्या पत्र्यावरून येऊन कातकरी वस्तीच्या खाली रस्त्यावरती पडत आहे त्यामुळे खाली शेवाळ खूप झालेले आहे. त्यामुळेच तेथे पाणी साचत आहे.आणि तेथील गोरगरीब कुटुंबाचा गोरगरीब समाजाचा आरोग्याचा प्रश्न हा खूप गंभीर स्वरूपाचा झालेला आहे. तसेच शेवाळामुळे तेथील गाड्या व लोक घसरून खाली पडत आहेत. तिथे शेवाळ आणि घाण पाणी साठल्यामुळे गोरगरीब समाजातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत.याला कारणीभूत म्हणून आपण तेथील निळा पत्रा तात्काळ काढण्यात यावा. असे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अन्यथा आम्ही पत्रकार बांधवांच्या साक्षीने पोलीस स्टेशनला रीतसर तक्रार करून तेथील पत्रा दोन दिवसात स्वतः काढणार आहोत. यावेळी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सर्वस्वी आयशर शोरूम स्वतः मालक मॅनेजर जबाबदार राहतील.